मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज)
पुणे महानगरपालिका.
ठराव क्र. : १/ ९९३
दिनांक : 30/12/2022.

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५.
जा.क्र.: अतिमआ(ज)/साप्रवि/ ९९१० .
दिनांक : 30/12/2022.

## -: आ ज्ञा प त्र :-

**विषय :** पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील "कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) - (वर्ग- ३)" या पदाच्या हंगामी नेमणूकीबाबत.

**संदर्भ :** १) महानगरपालिका जाहिरात क्रमांक १/३९८ दिनांक २०/०७/२०२२.
२) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र.१/ २८२, दि. 30/12/2022.
३) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठराव क्र. १/ ९९२, दि. 30/12/2022 .

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अभियांत्रिकी संवर्गातील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) वर्ग- ३ (पे मेट्रीक्स S-१४ : ३८६०० – १२२८०० + मान्य भत्ते) या पदाच्या शेड्युलमान्य रिक्त जागेवर सरळसेवेने हंगामी नेमणुक करण्यासाठी संदर्भ क्र. १ अन्वये जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार खालील उमेदवारांची नेमणूक करणेसाठी तयार करण्यात आलेल्या निवडयादीस संदर्भ क्र. २ चे ठरावान्वये मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर मान्यताप्राप्त निवड यादीवरील पुणे महानगरपालिका आस्थापनेवर खालील उमेदवारांची त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तपशिलानुसार या आज्ञापत्राच्या दिनांकापासून हंगामी नेमणुक करण्यात येत आहे.

नियुक्त कर्मचा-यांना प्रथमत: सहा महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करावा लागेल. त्यानंतर त्यांना प्रत्यक्ष खात्यात नेमणूक दिली जाईल.

**"कनिष्ठ अभियंता ( स्थापत्य) - (वर्ग- ३) (पे मेट्रीक्स S - १४ : ३८६०० – १२२८००+ मान्य भत्ते)"**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा मुळ/ अर्जा तील प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 1) | SURAJ VISHVAMBHAR WAGHE | NT-C | OPEN |
| 2) | PRATIK PANDURANG SHIROLE | OBC | OPEN |
| 3) | ANIKET VIJAY PATIL | OPEN | OPEN |
| 4) | RAMIJ RIYAJ FARAS | OBC | OPEN |
| 5) | PRIYANKA BASTIRAM AVHAD | OPEN | OPEN_F |
| 6) | JAYANT DILIPKUMAR SAPKAL | OPEN | OPEN |
| 7) | VISHWAJIT NALAWADE | VJ-A | OPEN |
| 8) | VIPUL SUDHIR TOTE | OBC | OPEN |
| 9) | MANGESH HARISHCHANDRA GADKAR | EWS | OPEN |
| 10) | SARANG JAGATRAO DEORE | OBC | OPEN |

Raut
30/12/2022

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा मुळ/ अर्जा तील प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 11) | RUSHIKESH VITTHAL SURYAVANSHI | OBC | OPEN |
| 12) | HARSHAL HEMANT MUKATE | EWS | OPEN |
| 13) | PAVAN PANDURANG KARANDE | OPEN | OPEN |
| 14) | DEVENDRASING JAGATSING RAJPUT | VJ-A | OPEN |
| 15) | SHUBHAM SHIVAJI ASWALE | OBC | OPEN |
| 16) | ROHAN SHANKAR SHEDGE | EWS | OPEN |
| 17) | MAYURESH KIRAN MORE<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | EWS | OPEN |
| 18) | MEGHA SARJERAO LAWAND | EWS | OPEN_F |
| 19) | MAYUR MANSHING JADHAV<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | EWS | OPEN |
| 20) | BALBHIM SHIVAJI MORE<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | EWS | OPEN |
| 21) | MANOHAR DEVIDAS MALI<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | OBC | OPEN |
| 22) | SHRIPAL ANANDRAO JADHAV<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | EWS | OPEN |
| 23) | SOURABH ARUNKUMAR SAKATE | SC | SC |
| 24) | AKSHAY DASHRATH WADEKAR | EWS | EWS |
| 25) | VASANT SUBHASH NAGRE | NT-D | NT-D |
| 26) | TEJAS SANJAY GAIKWAD | EWS | EWS |
| 27) | JAYESH SUDHIR PATIL | OBC | OBC |
| 28) | HEMANTKUMAR RAGHUNATH DESAI | EWS | EWS |
| 29) | ROHAN SAKHARAM SHIGWAN | OBC | OBC |
| 30) | RAHUL TANAJI KADAM<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | EWS | EWS |
| 31) | NIKHIL ANANDRAO MORE<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | EWS | EWS |
| 32) | KISHOR KAMALAKAR DHAKANE | OPEN | OPEN_PA |
| 33) | KAMLESH KABIRDAS NAGESHWAR | SC | SC |
| 34) | MANASI MAHESH HARKARE | OPEN | OPEN_F |
| 35) | ANIKET BANDOPANT SHINDE | OBC | OBC |
| 36) | VINAY VIKAS YELPALE | SC | SC |

Raut
30/12/2022

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा मुळ/ अर्जा तील प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 37) | SANGRAM RAVINDRA PAWAR<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | EWS | EWS |
| 38) | YOGESH PRAKASH TAMBAT | OBC | OBC |
| 39) | PRANAV SHEKHAR DALVI | OBC | OBC |
| 40) | MAYUR KISHOR INGALE | OBC | OBC |
| 41) | ONKAR SANJAY NIKUMBH | OBC | OBC |
| 42) | TUSHAR DNYANDEO PACHPANDE | OBC | OBC_PwBD_A |
| 43) | RAHUL NANA MAHAJAN<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | OBC | OBC |
| 44) | VISHAL MAHADEV JADHAV<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | OBC | OBC |
| 45) | SHRADHA MAROTRAO NARWADE | OPEN | OPEN_F |
| 46) | AKHIL SACHIN CHAVAN<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | OBC | OBC |
| 47) | AJINKYA AJIT ABITKAR | EWS | EWS_PwBD_A |
| 48) | LALITKUMAR VISHWASRAO PATIL<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | OBC | OBC |
| 49) | AVINASH VISHWANATH INGOLE<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | OBC | OBC |
| 50) | VIRAJ KIRAN GIRME<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | OBC | OBC |
| 51) | AISHWARYA KASHINATH KAPTE | EWS | OPEN_F |
| 52) | LALIT RAVINDRA DEORE<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | OBC | OBC |
| 53) | SACHIN LAXMAN LAWATE | NT-C | NT-C |
| 54) | TRUPTI DEVIDAS PHAPAL | EWS | OPEN_F |
| 55) | SAGAR TANAJIRAO SINGARE | OPEN | OPEN_PA |
| 56) | PRIYA SUNIL SAWALE | OPEN | OPEN_F |
| 57) | SUMIT SHIVAJI CHOUGULE<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | NT-C | NT-C |
| 58) | SAMBHAJI NETAJI KAWATHE | OPEN | OPEN_EQ |
| 59) | MEDHA PRAKASH HOLE | OBC | OPEN_F |
| 60) | RAMESH KISANRAO SANAP | OPEN | OPEN_PA |
| 61) | ROHAN SHIVAJI DIVATE | SBC | SBC |

Raut
30/12/2022

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा मुळ/ अर्जा तील प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 62) | ROHAN ANANT KAPSE | EWS | EWS_PA |
| 63) | ABHISHEK JAGANNATH KUSALKAR | VJ-A | VJ-A |
| 64) | ROHAN RAJENDRA HATTE | SBC | SBC |
| 65) | GAURI SANTOSH POTDAR | OBC | OPEN_F |
| 66) | VEDWATI BHAGWAT TODKARI | EWS | OPEN_F |
| 67) | HUMERA ASHPAK MOMIN | OBC | OPEN_F |
| 68) | SHUBHAM DATTARAYA CHINEWAR | NT-B | NT-B |
| 69) | SANTOSH GULAB KAMBLE | SC | SC |
| 70) | SOPAN APPASO RUPNAR<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | NT-C | NT-C |
| 71) | HITESH TUKARAM ADE | VJ-A | VJ-A |
| 72) | MAHESH SAHADEV KADAM | SC | SC |
| 73) | NIKHIL RAMSING GANGURDE | ST | ST |
| 74) | AKSHAY BHANUDAS TOTKAR | OBC | OPEN_SP |
| 75) | VANASHRI MHATARDEO DHAYTADAK | NT-D | OPEN_F |
| 76) | SAURABH PRAMOD KHARAT<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | SC | SC |
| 77) | SAMPADA SUSHIL KALE | NT-C | OPEN_F |
| 78) | PRAJAKTA RAMESH PATIL | EWS | OPEN_F |
| 79) | MAYUR GEDAM<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | SC | SC |
| 80) | MADHURI DADASO THOMBARE | NT-C | OPEN_F |
| 81) | BHUSHAN LAXMAN KOKATE<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | SC | SC |
| 82) | SHRUTIKA GOROBA PHAWADE | EWS | EWS_F |
| 83) | PRAJAKTA PRAKASH PATIL | OBC | OBC_F |
| 84) | RUPESH VILAS GADILKAR | OBC | OBC_PA |
| 85) | SHUBHANGI KAKASAHEB TURUKMARE | SC | SC_F |
| 86) | PRASHANT PRADEEP PARDESHI<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | VJ-A | VJ-A |
| 87) | SONALI ABASAHEB JADHAV | EWS | EWS_F |

Raut
30/12/2022

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा मुळ/ अर्जा तील प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 88) | BHUSHAN RAJENDRA YADAV | EWS | OPEN_SP |
| 89) | GANESH MAHADEO HARER | NT-B | NT-B |
| 90) | ASHISH PANDIT JAMADHADE (अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | SC | SC |
| 91) | SWATI TRIMBAK BANGAR | NT-D | NT-D_F |
| 92) | PRIYANKA KISHOR MAHALE | OBC | OBC_F |
| 93) | HIMANI NARENDRA PATLE | OBC | OBC_F |
| 94) | SUNIL JAYSING PARMESHWAR (अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | SC | SC |
| 95) | SHIVANI RAJENDRA YADAV | OBC | OBC_F |
| 96) | NUTAN RAOSAHEB SINARE | EWS | EWS_F |
| 97) | PRADEEP LALASO NANEKAR | EWS | OPEN_SP |
| 98) | NIKHIL NITIN DHALE | SC | SC_ORPHAN |
| 99) | RASHMI RAMCHANDRA PATIL | EWS | EWS_F |
| 100) | TEJASWINI ARUN BAGUL | OBC | OBC_F |
| 101) | TEJAL PRAKASH GODASE | OBC | OBC_F |
| 102) | SHITAL RAJENDRA BHOITE | OBC | OBC_F |
| 103) | POOJA SAHEBA NANNAWARE | SC | SC_F |
| 104) | NEELAKSHI BANDU TADASE | ST | ST_F |
| 105) | RUNALI SUNIL GARDI | OBC | OBC_F |
| 106) | SAYALI BAJIRAO GADADE | NT-C | NT-C_F |
| 107) | VAISHALI RAJENDRA JADHAV | SC | SC_F |
| 108) | NITESH WALKU MORE | ST | ST |
| 109) | AISHWARYA BALASAHEB SATPUTE | NT-B | NT-B_F |
| 110) | BHAVANA VILAS CHAVAN | VJ-A | VJ-A_F |
| 111) | POONAM SHESHRAO CHANKAPURE | SC | SC_F |
| 112) | SONALI ATMARAM WANJARI | SC | SC_F |
| 113) | SHUBHAM SATISH BABAR | S C | SC_SP |
| 114) | RUTUJA PANDURANG CHILKEWAR | SBC | SBC_F |
| 115) | CHAITALI BABAN PUJARI | NT-C | NT-C_F |



Raut
30/12/2022

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा मुळ/ अर्जा तील प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 116) | AKASHKUMAR VISHWAS GAVIT | ST | ST |
| 117) | PAWANKUMAR BHIMRAO JOGAWAR | ST | ST |
| 118) | NIKHIL MARUTI GHARAT<br>(माजी सैनिक उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | ST | ST |
| 119) | SHUBHAM ANIL DESHMUKH<br>(अंशकालीन उमेदवार उपलब्ध न झाल्याने) | ST | ST |
| 120) | VIKEEN RAMLING NIRMALE | OBC | OBC_EQ |
| 121) | HEMA SUDAM KEDARI | ST | ST_F |
| 122) | SANTOSH MAHADEO NALAWADE | OPEN | OPEN_EX |
| 123) | GANESH SHRIDHAR KAKAD | NT-D | NT-D_ PwBD_C |
| 124) | SUDHIR BABAN SAKPAL | OPEN | OPEN_EX |
| 125) | BHAVIKA PRATAPSING THAKUR | ST | ST_F |
| 126) | PRATIK MANOHAR THORAT | EWS | EWS_SP |
| 127) | SAURABH SANJAY TEMBHIKAR | OPEN | OPEN_ PwBD_B |
| 128) | PRADIP BHAGAWAT UMAP | OPEN | OPEN_EX |
| 129) | PRATIK MAROTRAO TAYWADE | OBC | OBC_SP |
| 130) | VASANT YESHAVANT SHINDE | OPEN | OPEN_EX |
| 131) | PRATIK SHAMUVEL DALVI | SC | SC_PA |
| 132) | DEEPAK RAMCHANDRA ROMAN | OPEN | OPEN_EX |
| 133) | RAVINDRA RAMJI WANKHEDE | OBC | OPEN_EX |
| 134) | ASHOK NARAYAN PAWAR | OPEN | OPEN_EX |
| 135) | RAJAN JAGANNATH PASTE | OPEN | OPEN_EX |

१) वरील उमेदवारांची नेमणूक महानगरपालिका सेवाविनियमातील क्र. १० (अ) नुसार दोन वर्षासाठी परिविक्षाधीन पध्दतीने करण्यात येत आहे. **उमेदवारांनी प्रथम सामान्य प्रशासन विभाग येथे हजर राहून आज्ञापत्राची मूळ प्रत व प्रशिक्षण कार्यक्रम प्राप्त करून घ्यावा.** आज्ञापत्रातील अटी व शर्तीची पूर्तता केले पश्चात प्रत्यक्ष नेमणूकीचे आदेश प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण झाल्यांनतर निर्गमित करण्यात येतील.

२) वरील उमेदवारांनी सामान्य प्रशासन विभागाकडून शारीरिक तपासणी करून घेणेबाबतचे पत्र घेऊन मा.अध्यक्ष, वैद्यकीय बोर्ड, पुणे महानगरपालिका यांचेमार्फत शारीरिक तपासणी करून घ्यावी. शारीरिक पात्रतेचा दाखला प्राप्त करून घ्यावा. शारीरिक पात्रतेचा दाखला असल्याशिवाय वरील उमेदवारास कामावर हजर करून घेणेत येऊ नये. उपरोक्त उमेदवारांना रुजू करुन घेण्यापूर्वी उमेदवारांकडून योग्य ती रक्कम सेवा अनामत म्हणून भरून घेणे, तदनंतर त्यांना रुजू करून घेऊन त्यांचे सेवापुस्तक तयार करून योग्य त्या नोंदी घेणेची तजविज सामान्य प्रशासन विभाग यांनी करावी.

३) वरील उमेदवारांची प्रत्यक्ष कामावर रुजू झाल्याचे दिनांकापासून प्रशिक्षणासह दोन वर्षातील कार्यालयीन उपस्थिती, वर्तणूक व कामातील प्रगती समाधानकारक/ असमाधानकारक असल्याची संबंधीत खातेप्रमुख यांनी खात्री करावी. तसेच उमेदवारांचे दोन वर्षातील काम समाधानकारक / असमाधानकारक याबाबतचा लेखी अहवाल संबंधित खातेप्रमुखांनी सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावा. प्रशिक्षण कालावधीतील अहवाल संबंधित खातेप्रमुखांनी कालावधी समाप्तीपश्चात सादर करावयाचा आहे.

४) उमेदवाराचे काम असमाधानकारक असल्याचा अहवाल संबंधित खातेप्रमुख यांचेकडून प्राप्त झाल्यास उमेदवारास कोणतेही कारण अगर पूर्वसुचना न देता पुणे महानगरपालिका सेवेतून कमी करण्यात येईल.

५) या आज्ञापत्रकातील अटी व शर्तींची पूर्तता झाल्याची खातरजमा खातेप्रमुखांचे अहवालानुसार, परिवीक्षाधीन कालावधी संपल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत परिविक्षाधीन कालावधी समाप्त करणेचे आदेश निर्गमित करण्यात येतील. सदर प्रशिक्षणासह परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्याचे आदेश निर्गमित झाल्यानंतरच परिवीक्षाधीन उमेदवारास दुसरी वेतनवाढ अनुज्ञेय करण्यात यावी. याबाबतची दक्षता संबंधित विभाग, मुख्य लेखा व वित्त विभाग आणि माहिती व तंत्रज्ञान विभाग यांनी घ्यावी.

६) महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियम) नियमावली २०२१ च्या अधिनतेने उमेदवारांची ज्येष्ठता राहील. तसेच उमेदवारांची सेवाजेष्ठता मान्य झालेल्या निवड यादीतील ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या गुणांकनानुसार राहील.

७) सदर आज्ञापत्रकातील सेवकाचे वेतनाबाबत महापालिका आयुक्त कार्यालयाकडील कार्यालय परिपत्रक जावक क्र. मआ/मुले/३१९३ दिनांक ११/११/२०२१ अन्वये कार्यवाही करणेबाबतची योग्य ती तजवीज खात्याने करावी. प्रशिक्षण कालावधीतील वेतन सामान्य प्रशासन विभागामार्फत काढण्यात यावे.

८) अनुभवाचा दाखला व इतर दाखल कागदपत्रांची वैधता व सत्यतेबाबतचे प्रतिज्ञापत्र, संबधित उमेदवारास रुजू करून घेण्यापूर्वी सादर करावे लागेल. त्याबाबतचा नमुना या आज्ञापत्रासोबत जोडला आहे. सदर प्रतिज्ञापत्र कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर केलेले असावे. संबंधित उमेदवाराने प्रतिज्ञापत्र सादर केल्याशिवाय उमेदवारास कामावर रुजू करून घेण्यात येऊ नये. तसेच वरील उमेदवार यांनी नेमणुकीचे संदर्भात जात, शैक्षणिक पात्रता, जन्म दिनांक, अनुभव इ. बाबत सादर केलेली माहिती केव्हाही असत्य असल्याचे आढळून आल्यास त्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता सेवेतून कमी करणेत येईल. तसेच त्यांना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदावर हक्क सांगता येणार नाही.

९) उमेदवारांना नेमणुकीचे जागी रुजू करून घेणेपूर्वी त्यांचे शैक्षणिक पात्रतेचे मूळ दाखले, जन्मदिनांका बाबतचे दाखले, जातीचे दाखले, अनुभव प्रमाणपत्र, अद्ययावत नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र इत्यादी संबंधीत कागदपत्रांची खातेप्रमुख यांनी खातरजमा करावी. जन्म दिनांकाबाबत जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. जर उमेदवाराकडे जन्म दिनांकाबाबत जन्म दाखला उपलब्ध नसेल तर त्याबाबतीत शाळा सोडल्याचा दाखला/शालांत परीक्षा प्रमाणपत्र यामध्ये नमूद केलेली जन्मतारीख ग्राह्य धरण्यात येईल. परंतु अशा उमेदवाराची भविष्यात जन्मतारीख बदलण्याची विनंती मान्य करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

१०) वरीलप्रमाणे पुणे महानगरपालिकामध्ये नेमणूक होत असलेले जे उमेदवार अन्य ठिकाणी (सरकारी/ निमसरकारी/ अगर खाजगी) नोकरी करीत असतील, त्यांनी तेथील नोकरीतून कोणत्याही स्वरुपाचा दोष न ठेवता त्यांना कार्यमुक्त करण्यात आले असल्याचा स्पष्ट उल्लेख असलेला दाखला महानगरपालिका सेवेत रुजू होताना नेमणूक खात्याकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर दाखला असल्याखेरिज त्यांना पुणे

Raut
30/12/2022

महानगरपालिकेच्या सेवेत रुजू करुन घेता येणार नाही. यापूर्वी अन्य ठिकाणी नोकरी करीत नसल्यास, दाखला सादर करता येणार नाही असे प्रतिज्ञापत्र दाखल करणे आवश्यक आहे.

११) जे उमेदवार ३० दिवसांच्या आत रूजू होणार नाहीत, अशा उमेदवारांचा अहवाल संबंधित खातेप्रमुख यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावा अथवा त्यांनी रुजू होणेसाठी मुदतवाढ मागितली असल्यास त्याबाबत सामान्य प्रशासन विभागास अवगत करावे.

१२) संबंधित उमेदवार हे आज्ञापत्र निर्गमित केल्यापासून १ महिन्याचे आत कामावर हजर न झाल्यास किंवा मुदतवाढ न मागितल्यास त्यांची नेमणूक रद्द समजण्यात येईल. तसेच त्यांचे निवडयादीवरील नाव कमी करणेत येईल व त्याबाबत त्यांचेशी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३) मे. महाराष्ट्र शासन जा.क्र. चारित्र्य-२०१७/प्र.क्र.४८३/२०१७/१६अ, दि. २८/०८/२०१७ चे निर्णयानुसार वरील उमेदवारांना तात्पुरते नियुक्ती पत्र निर्गमित करणेत येत आहे. सदर उमेदवारांनी शासन निर्णयानुसार स्वयंसाक्षांकित नमुना सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावा. संबंधित खातेप्रमुख यांनी सदर साक्षांकन संबंधित पोलिस आयुक्त/ पोलिस अधीक्षक यांचेकडे पत्रव्यवहार करावयाचा असून त्याची प्रत संबंधीत उमेदवारांस द्यावयाचे आहे. पोलिस यंत्रणेकडून चारित्र्य व पूर्व चारित्र्य याचे पडताळणी सहा महिन्याचे आत प्राप्त करून घेण्यात यावी. तसेच उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य असल्याचे आढळून आल्यास नियुक्ती रद्द करून भारतीय दंडसंहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरूपी अपात्र ठरविण्यात येईल.

१४) मे. शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११, अन्वये वरील आज्ञापत्रामधील ज्या सेवकांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे. अशा सेवकांची त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती करण्यात आली आहे. ज्या सेवकांची निवड मागासप्रवर्गातील अनुसूचित जमाती गटासाठी करण्यात आली आहे, त्यांनी जातपडताळणी प्रमाणपत्र नियुक्ती पूर्वी सादर करणे बंधनकारक आहे आणि विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या अन्य जागेवर झाली आहे अशा सेवकांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ (सहा) महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता सादर करणे बंधनकारक आहे. मागासवर्गीय सेवकांनी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात वैधता समितीकडे सादर करावा व जात पडताळणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत आस्थापना विभाग कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर संबंधीत सेवकाचे नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील.

१५) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ उमेदवाराने नेमणुकीचे खात्याकडे रुजू होताना भरून देणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास संबंधित खात्याने रुजू करून घेऊ नये. (महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. एस.आर.व्ही.- २०००/ प्र.क्र.१७/ २०००/१२, दि. ०१/०७/२००५)

१६) उपरोक्त उमेदवारांना निवृत्तीवेतन योजना अनुज्ञेय राहणार नाही. उपरोक्त सर्व उमेदवारांना महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/ १२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये लागू करण्यात आलेली अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. अंशदान निवृत्ती वेतनाबाबतचे महाराष्ट्र शासनाने तयार केलेले नियम लागू राहतील.

Raut
30/12/2021

१७) शासन परिपत्रक, वित्त विभाग संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दि. २२/११/२०२१ चे सहपत्रानुसार सदर आदेशा पासून १ महिन्याच्या आत अतिप्रदान रक्कमेबाबत वचनपत्र भरून सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे बंधनकारक असेल.

१८) उपरोक्त उमेदवारांना महानगरपालिका सेवाविनियम व सेवावर्तणूक नियम लागू राहतील, तसेच सदर नियमांचे पालन करणेबाबतच्या सूचना संबंधित खातेप्रमुख यांनी सदर उमेदवारांना देणेची तजवीज करावी.

१९) उपरोक्त उमेदवारांनी यापूर्वी मराठी / हिंदी भाषा परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सूट मिळाली नसेल तर त्यांनी यासंबंधी शासनाच्या प्रचलित नियमानुसार भाषा परिक्षा त्यांना विहित मुदतीत उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

२०) उपरोक्त उमेदवारांनी संगणक माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र रुजू होताच सादर करावे. किंवा

- दि.०४/०२/२०१३ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे उमेदवारांनी संगणक अर्हता धारण केलेली नसेल अशा उमेदवारांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/३/२००३ मधील तरतुदीनुसार संगणक हाताळणी विषयक प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करून सादर करावे. अन्यथा हा कालावधी संपताच त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल व याबाबत त्यांचे कोणतेही निवेदन विचारात घेतले जाणार नाही. अथवा, परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून कोणालाही सूट दिली जाणार नाही. अथवा, परीक्षा उत्तीर्ण होण्यास मुदतवाढही दिली जाणार नाही.
- संगणक अर्हतेबाबत सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन पुरकपत्रक क्र. मातंसं २०१२/प्र.क्र.२७७/३९ दि.०८/०१/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.
- तसेच शासन पुरकपत्र दि.१६/०७/२०१८ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले संगणक हाताळणी विषयक ज्ञानाबाबतचे शासन निर्णय व पुरकपत्रक यानुसार कार्यवाही खातेप्रमुख यांनी करावी.

२१) महापालिका आयुक्त कार्यालयाकडील जा.क्र. मआ/उआ (ज)/६९०, दि.८/१०/२०१४ चे कार्यालयीन आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेतील प्रत्येक मनपा अधिकारी/ कर्मचाऱ्याने (वर्ग-४ मधील कर्मचारी वगळता) मनपा सेवेतील कोणत्याही पदावरील नियुक्तीव्दारे त्याच्या प्रथम सेवाप्रवेशाच्या वेळी, अशा नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालावधीत त्याची स्वतःची मत्ता व दायित्वे याबाबतची विवरणे प्रपत्र १, २ व ३ यातील प्रपत्रामध्ये (म्हणजे (१) अचल मालमत्तेचे विवरण पत्र, (२) चल मालमत्तेचे विवरण पत्र आणि (३) कर्जे व दायित्व विवरण पत्र) ते सध्या सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावीत.

२२) पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ नुसार सर्व संबंधित सेवकांनी परिशिष्ट ३-अ, नियम - ३ मध्ये नमूद केलेली अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक यांचेकडील विभागीय परिक्षा चार वर्षात तीन संधीमध्ये उत्तीर्ण होणे अनिवार्य असून सदर परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास शासन निर्णयानुसार संबंधित खातेप्रमुख यांनी पुढील योग्य ती कार्यवाही करावयाची आहे.

२३) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दि.२५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार खुला (महिला) आणि मागासप्रवर्गातील महिलांसाठीच्या राखीव पदांकरिता निवड झालेल्या उमेदवारांची, "महिलांसाठी उन्नत व प्रगत व्यक्ती गट (क्रिमीलेअर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र" (अलिकडचे/नवीनतम मूळ नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र) ची साक्षांकित प्रत तपासणीसाठी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे

Raut
30/12/2022

यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने खुला (महिला) व मागास प्रवर्गातील महिलांसाठीच्या राखीव पदांकरिता निवड झालेल्या महिला उमेदवारांचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र दोन प्रतीत सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावे. खुला (महिला) आणि मागास प्रवर्गातील महिलांसाठीच्या राखीव पदांकरिता निवड झालेल्या महिला उमेदवारांची नियुक्ती सादर तपासणी अहवालाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. आयुक्त, महिला व बाल विकास पुणे यांचेकडून प्राप्त अहवालानुसार महिला उमेदवार अपात्र ठरत असल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२४) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि. १ जुलै २०१६ व दि.१९ मार्च २०१९ मध्ये खेळाडू उमेदवारांचे प्रमाणपत्र संबंधित उप संचालक क्रीडा व युवक सेवा यांनी प्रमाणित केलेले असल्याची संबधित खातेप्रमुख यांनी खात्री करावी.

२५) वरील उमेदवारांची नेमणूक पूर्णपणे हंगामी असून त्यांना खाजगी विभागात सेवा देता येणार नाही. तसेच त्यांना महानगरपालिका सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी एक महिन्याची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. पूर्वसूचना न देता राजीनामा दिल्यास एक महिन्याच्या मुदतीपेक्षा राजीनाम्याची मुदत जितक्या दिवसांनी कमी असेल तितक्या दिवसांच्या पगाराची रक्कम (सर्व भत्त्यांसहित) त्यांचेकडून वसुल करणेत येईल, अशी समज खात्याने त्यांना द्यावी व समज मिळाल्याबद्दल आज्ञापत्रावर त्यांची स्वाक्षरी घ्यावी.

२६) ज्या उमेदवारांनी अनुभवाबाबत प्रमाणपत्र सादर केले आहे, त्यांनी सादर केलेल्या अनुभवाबाबत प्रतिकुल (चुकीची अथवा खोटी) माहिती आढळल्यास कोणत्याही प्रकारची सुचना न देता नियमानुसार सेवा संपुष्टात आणण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहील.

२७) संबधित उमेदवार कामावर रुजू होताच त्याप्रमाणे जरुर ते निवेदन व सदर उमेदवाराचा रूजू अहवाल, पोलिस चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्राची प्रत, इत्यादी कागदपत्राच्या उमेदवारनिहाय साक्षांकित प्रती इत्यादीबाबतची पूर्तता सामान्य प्रशासन विभागाने करावयाची आहे.

२८) वरील उमेदवारांना महानगरपालिका सेवाविनियमानुसार वेतन व भत्ते नेमणुक खात्याने अदा करावयाचे आहेत. या आज्ञापत्रातील उपरोक्त सर्व अटी/शर्ती संबंधित उमेदवारांवर बंधनकारक राहतील.

२९) या आज्ञापत्रातील उपरोक्त अटी/शर्ती व वेळोवेळी मे. राज्य शासन व मे. न्यायालय निर्गमित करील ते आदेश संबंधित उमेदवारांवर बंधनकारक राहतील.

वरील सर्व अटी/शर्तींची काटेकोरपणे पूर्तता संबंधित उमेदवाराकडून करुन घेणेची जबाबदारी संबंधित खातेप्रमुख यांची राहील.

तरी, संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी जरुर ती तजवीज करावी.

Raut

(रविंद्र बिनवडे)

**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**

पुणे महानगरपालिका

30/12/2022

प्रत : १) संबंधित खातेप्रमुख /विभागप्रमुख, पुणे महानगरपालिका

२) मुख्य लेखा व वित्त विभाग, पुणे महानगरपालिका

३) माहिती व तंत्रज्ञान विभाग, पुणे महानगरपालिका

माहिती व पुढील कार्यवाहीसाठी...